शनिवार, दि. २३ मे २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २६१ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

[illegible] हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जुना जालन्यात नालीच्या किरकोळ वादातून घरात घुसून कोयता हल्ला

### बहीण रक्ताच्या थारोळ्यात, थरारक व्हिडिओ व्हायरल!

**जालना -प्रतिनिधी**

जुना जालना परिसरातील संजय नगर भागात नालीच्या एका किरकोळ वादाने अत्यंत हिंसक आणि धक्कादायक वळण घेतल्याची घटना उघडकीस आली आहे. घरात बेकायदेशीरपणे घुसून एका महिलेच्या डोक्यात आणि कपाळावर कोयत्याने जीवघेणा वार करण्यात आला असून, या हल्ल्याचा एक थरारक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आल्याने संपूर्ण जालना शहरात मोठी खळबळ उडाली आहे. या हल्ल्यात पीडित महिला गंभीर जखमी होऊन रक्तबंबाळ अवस्थेत जागीच बेशुद्ध पडली असून, तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी कदीम जालना पोलिसांनी गुन्हा नोंदवण्यास टाळाटाळ केल्याचा गंभीर आरोप करत पीडित कुटुंबाने थेट जालना जिल्हा पोलीस अधीक्षकांचे () दार ठोठावले आहे. नाली उघडल्याचा राग मनात धरून वाद



मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, संजय नगर येथील रहिवासी शेख सलीम शेख मोईद्दीन यांच्या घरासमोरील सार्वजनिक नाली काही संशयित व्यक्तींनी दगड-माती टाकून जाणीवपूर्वक बंद केली होती. नाली बंद झाल्यामुळे परिसरात घाण पाणी साचून दुर्गंधी पसरली होती, तसेच डासांचा प्रादुर्भाव वाढला होता. त्यामुळे त्रस्त झालेल्या शेख सलीम यांनी ती नाली साफ करून उघडली. मात्र, याच कारणावरून काही दिवसांपूर्वी परिसरातील काही जणांनी सलीम यांच्याशी वाद घातला होता. त्यावेळी स्थानिक नागरिकांनी मध्यस्थी करून तो वाद तात्पुरता मिटवला होता. घरात घुसून कोयता आणि काठ्यांनी तांडव

जुना वाद मिटला असे वाटत असतानाच, काल दिनांक २१ मे २०२६ रोजी आरोपींनी पुन्हा एकदा जुन्या वादाची कुरापत काढली. आरोपी अत्यंत संतप्त अवस्थेत हातात घातक शस्त्रे घेऊन शेख सलीम यांच्या घरासमोर आले. त्यांनी सुरुवातीला घराच्या दिशेने जोरदार दगडफेक करत अश्लील शिवीगाळ सुरू केली. त्यानंतर आरोपींनी मुख्य दरवाजा तोडून हातात कोयते आणि लाकडी काठ्यांसह घरात जबरदस्तीने प्रवेश केला. ''तू बंद केलेली नाली का उघडली? तुझी एवढी हिंमत कशी झाली?'' असा जाब विचारत आरोपींनी घरात उपस्थित असलेल्या महिला व पुरुषांना बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली.

बहिणीच्या कपाळावर कोयत्याचा जीवघेणा वार याच गोंधळात समीरखान जफरखान नावाच्या संशयिताने हातात असलेल्या तीक्ष्ण कोयत्याने शेख सलीम यांच्या बहिणीवर थेट वार केला. हा वार महिलेच्या कपाळावर आणि डोक्यावर अत्यंत जोरात बसल्याने, तिच्या कपाळातून रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या. ती महिला रक्तबंबाळ अवस्थेत जागीच कोसळली आणि बेशुद्ध झाली. या थरारक हल्ल्यामुळे घरात एकच किंचाळ्या आणि रडारड सुरू झाली. हल्ला केल्यानंतर आरोपींनी परिसरात दहशत निर्माण करत तेथून (पान २ वर)

## जालना जिल्हा घरगणना मोहिमेत राज्यात अव्वल

### हाऊस लिस्टिंग ऑपरेशनमध्ये ९४.५९ टक्के प्रगती

**जालना- प्रतिनिधी**

जनगणना २०२७ अंतर्गत सुरू असलेल्या घरगणना ( ) कार्यक्रमात जालना जिल्ह्याने महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या या मोहिमेत जालना जिल्ह्याने राज्यातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत सर्वाधिक प्रगती साधली आहे.

राज्यस्तरीय आढाव्यानुसार, जालना जिल्ह्यातील एकूण २८६३ पैकी २७०८ चे काम पूर्ण झाले असून, जिल्ह्याने तब्बल ९४.५९ टक्के प्रगती साधली आहे. ही प्रगती राज्यातील सर्वाधिक असून, जिल्हा प्रशासनाच्या नियोजनबद्ध कार्यपद्धतीची आणि कर्मचाऱ्यांच्या समन्वयाची ही मोठी पावती मानली जात आहे.

जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा जनगणना कक्ष, पर्यवेक्षक, प्रगणक अधिकारी आणि संबंधित कर्मचाऱ्यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा करत ही कामगिरी साध्य केली आहे. प्रशासनाच्या काटेकोर नियोजनामुळे आणि कर्मचाऱ्यांच्या मेहनतीमुळे घरगणना मोहिमेला वेग मिळाला असल्याचे स्पष्ट होत आहे.

या यशाबद्दल जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले असून, उर्वरित कामही निर्धारित वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, जनगणना-२०२७ ही देशाच्या नियोजन प्रक्रियेसाठी अत्यंत महत्त्वाची मोहीम असल्याने नागरिकांनीही प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

## नीट पेपर फुटीतील आरोपींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

### विद्यार्थ्यांच्या भविष्याचा सौदा करणाऱ्यांना कठोर शिक्षा द्या : गणेश गिराम

**जालना -प्रतिनिधी**

वैद्यकीय शिक्षणासाठी रात्रंदिवस मेहनत घेणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणातील आरोपींवर देशद्रोहासह संघटित गुन्हेगारी अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सिंधीकाळेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते गणेश गिराम यांनी केली आहे.यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात गणेश गिराम यांनी म्हटले आहे की, देशातील अत्यंत महत्त्वाची आणि संवेदनशील मानली जाणारी नीट परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी थेट संबंधित आहे. अशा परीक्षेचे पेपर लाखो रुपयांत विक्री करून काही आरोपींनी केवळ विद्यार्थ्यांची फसवणूक केली नसून संपूर्ण शिक्षण व्यवस्थेलाच काळिमा फासण्याचे काम केले आहे. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी कठीण परिस्थितीत अभ्यास करून डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहतात. मात्र पैशाच्या जोरावर पेपरफुटी करून गुणवंत विद्यार्थ्यांवर अन्याय केला जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले असून सरकारने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींना (पान २ वर)



## ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या कथित खोट्या वास्तव्यास प्रकरणी संभाजी ब्रिगेडची निष्पक्ष चौकशीची मागणी

**मंठा -प्रतिनिधी**

मंठा तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींमध्ये कार्यरत असलेल्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी मुख्यालय वास्तव्यासंदर्भात ग्रामपंचायत इतिवृत्तामध्ये खोटी माहिती नोंदवून शासन, ग्रामसभा व ग्रामस्थांची दिशाभूल केल्याचा गंभीर आरोप करत संभाजी ब्रिगेड मंठाच्या वतीने गटविकास अधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन देण्यात आले आहे. संबंधित दोषींवर प्रशासकीय, आर्थिक व फौजदारी कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. संभाजी ब्रिगेडच्या वतीने मागील बारा दिवस पंचायत समितीसमोर जनआक्रोश आंदोलन करण्यात आले होते. आंदोलनादरम्यान अनेक ग्रामपंचायत अधिकारी हे नियुक्त मुख्यालयी वास्तव्यास राहत नसल्याचे आरोप करण्यात आले होते. यासंदर्भात प्रशासनाकडे वारंवार निवेदने, व्हिडिओ पुरावे व प्रत्यक्ष वस्तुस्थिती सादर करण्यात आली होती. त्यानंतर प्रशासनामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेल्या विविध ग्रामपंचायतींच्या इतिवृत्तांच्या सत्यप्रतींचा अभ्यास केल्यानंतर अनेक गंभीर बाबी समोर आल्याचा दावा संभाजी ब्रिगेडने केला आहे. निवेदनानुसार अनेक अधिकाऱ्यांनी ''भाडेतत्त्वावर वास्तव्यास असल्याचे'' दाखवत विविध घरांचे पत्ते इतिवृत्तामध्ये नमूद केले आहेत. काही ठिकाणी स्थानिक पदाधिकारी, सदस्य किंवा (पान २ वर)

## अशोक खरात प्रकरणातून सरकारने जागे होऊन जादूटोणा कायदा प्रभावीपणे राबवावा– प्रा. मानव

**जालना -प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या सरकारमधील मंडळीच अंधश्रद्धा वाढविण्याचे कार्य करीत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भोंदू अशोक खरात प्रकरणातून जागे होवून राज्यातजादूटोणा कायदा प्रभावीपणे राबवावा, अशी मागणी अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक प्रा. श्याम मानव यांनी आज येथे पत्रकार परिषदेत केली. भाग्यनगरमधील मराठा सेवा संघाच्या सहभागृहात आयोजित या पत्रकार परिषदेस अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुरेश झुरमूरे, दत्ता शिरसाट, जालना जिल्हाध्यक्ष मोहन राठोड, जिल्हा कार्याध्यक्ष काकासाहेब खरात, जिल्हा संघटक सुनील वाघ, कॉ. अण्णा सावंत, डॉ. रावसाहेब ढवळे, प्रा. सुभाष देठे आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना प्रा. मानव पुढे म्हणाले की, राज्यातील सरकार व त्यांच्या धोरणामुळे अशोक खरात सारखे भोंदू निर्माण झाले आहेत, अशोक खरात याने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केले आहे, त्याला राजाश्रय मिळाल्यानेच त्याने असे कृत्य करण्याचे धाडस केले आहे. सरकार हिंदूचे रक्षण करणारे असल्याचे दावे करीत असताना अशोक खरात याने हिंदू महिलांचेच लैंगिक शोषण केले असल्याचे प्रा. मानव म्हणाले. महाराष्ट्र राज्यात जादूटोणा कायदा प्रभावीपणे राबविण्यात आला (पान २ वर)

## भटक्या कुत्र्यांचा हल्ला... जखमी हरणाचा आक्रोश... अन् धावून आली खाकी व गुरुजी

### भोकरदनमध्ये पोलिस कॉन्स्टेबल आणि शिक्षकांनी दाखवले माणुसकीचे जिवंत उदाहरण

**भोकरदन -प्रतिनिधी**

भोकरदन शहरातील जालना रोडवरील नांजा पाटी परिसरात पेट्रोल पंपाजवळ एका हरणावर भटक्या कुत्र्यांच्या झुंडीने अचानक हल्ला चढवला. जीव वाचवण्यासाठी धडपडणारे हरिण गंभीर जखमी अवस्थेत तडफडत असताना परिसरात एकच खळबळ उडाली होती.यावेळी कर्तव्याला सदैव तत्पर असलेले भोकरदन पोलीस स्टेशनचे पोलिस कॉन्स्टेबल संदीप भुतेकर, किशोर मोरे घटनास्थळी धावून पोहोचले.त्याचवेळी जनगणनेच्या कामासाठी निघालेले शिक्षक कृष्णा बावस्कर,अक्षय शिंगणे,सुनील सातपुते व भास्कर



कळवणे यांनीही प्रसंगाचे गांभीर्य ओळखत क्षणाचाही विलंब न करता जखमी हरणाला कुत्र्यांच्या तावडीतून सुखरूप बाहेर काढले.प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, कुत्र्यांच्या हल्ल्यामुळे हरिण पूर्णपणे घाबरून गेले होते.परिसरातील नागरिकांनी आरडाओरडा करत कुत्र्यांना पळवून लावण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिस कॉन्स्टेबल संदीप भुतेकर व किशोर मोरे व शिक्षकांनी धाडस दाखवत जखमी हरणाला सुरक्षित स्थळी हलवले आणि त्याचे प्राण वाचवले.स्थानिकांनी जिथे कोणी नाही तिथे खाकी त्याचबरोबर शिक्षक '' अशी प्रतिक्रिया देत यांच्या तत्परतेचे जोरदार कौतुक केले. जखमी (पान २ वर)

## अंतरावलीत पुन्हा हायव्होल्टेज ड्रामा! जरांगेंची सरकारला २८ मेची डेडलाईन

### भाजप आमदार प्रसाद लाड यांच्या मध्यस्थीनंतर ३० मेच्या उपोषणावर तूर्त वेट अँड वॉच

**जालना – प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या प्रलंबित मागण्यांसाठी पुन्हा एकदा आंदोलनाचे अस्त्र उपसणारे नेते मनोज जरांगे पाटील आणि राज्य सरकार यांच्यातील संघर्ष तूर्त संवादाच्या पातळीवर आला आहे. आगामी ३० मे पासून सुरू होणाऱ्या संभाव्य आमरण उपोषणाच्या पार्श्वभूमीवर, आज (२२ मे) भाजप आमदार प्रसाद लाड यांनी थेट अंतरवाली सराटी येथे जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांमध्ये कॅमेऱ्यासमोर अत्यंत खडाजंगी आणि सविस्तर चर्चा झाली. या बैठकीनंतर जरांगे पाटील यांनी सरकारला मागण्या मान्य करण्यासाठी २८ मे पर्यंतची अंतिम मुदत (डेडलाईन) दिली असून, २९ मे रोजी आमदार प्रसाद लाड पुन्हा सकारात्मक उत्तरासह अंतरवालीत येणार आहेत. त्यामुळे पुढील आठवडा मराठा आरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत कळीचा ठरणार आहे.

**कॅमेऱ्यासमोर लाड-जरांगे संवादः काय झाली चर्चा?**

३० मेच्या आंदोलनाची तीव्रता लक्षात घेता, सरकारच्या वतीने मध्यस्थ म्हणून आमदार प्रसाद लाड आज सकाळी अंतरवाली सराटीत दाखल झाले. त्यांनी जरांगे पाटील यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला आणि उपोषण न करण्याची विनंती केली.

मागण्यांवर सरकार गंभीरः जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करताना प्रसाद लाड म्हणाले, ''मनोज जरांगे यांच्या मागण्यांबाबत राज्य सरकार अत्यंत गंभीर आहे. मी त्यांच्या सर्व भावना आणि मागण्या घेऊन तातडीने मुंबईला रवाना होत आहे. मुंबईत गेल्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी यावर थेट चर्चा केली जाईल.''

मराठा आरक्षण उपसमिती निर्णय घेणारः लाड यांनी पुढे स्पष्ट केले की, ''येत्या २८ मे पर्यंत मराठा आरक्षण उपसमिती या मागण्यांवर अधिकृत उत्तर देईल. जर उपसमितीने वेळेत निर्णय घेतला नाही, तर स्वतः मुख्यमंत्री यात अंतिम हस्तक्षेप करतील. पण आम्ही मनोज जरांगेंवर पुन्हा उपोषणाची वेळ येऊ देणार नाही.''

२९ मेला दुसरी भेटः मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून आणि सकारात्मक तोडगा घेऊन आपण स्वतः २९ मे रोजी पुन्हा अंतरवाली सराटीत जरांगे पाटलांच्या भेटीला येऊ, असा शब्द लाड यांनी यावेळी दिला.

**'आम्ही तुम्हाला गरीब मराठे दाखवतो'';**

**जरांगे पाटलांचा निकषांवरून प्रहार**

या बैठकीदरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी नेहमीच्या आक्रमक शैलीत सरकारला आणि प्रशासनाला धारेवर धरले. आरक्षणाच्या मागासलेपणाच्या निकषांवरून त्यांनी थेट सवाल उपस्थित केला. ''आरक्षणासाठी गरीब हा निकष लावला आहे का? तसे असेल तर आम्ही तुम्हाला गरीब मराठे दाखवतो. मराठ्यांकडे काही शाळा, कॉलेज किंवा कारखाने आहेत म्हणून काय संपूर्ण समाजाला आरक्षण नाकारायचे का? सामान्य मराठा आजही अत्यंत हलाखीत जगत आहे,'' असा उद्वेग जरांगे यांनी व्यक्त केला. ते पुढे म्हणाले, ''माझे आणि देवेंद्र फडणवीस किंवा प्रसाद लाड यांचे वैयक्तिक कोणतेही वैर नाही. आमदार लाड यांनी शब्द दिला आहे, त्यामुळे त्यांच्यावर विश्वास ठेवून २३ मे पर्यंत आमच्या सर्व बैठका आम्ही थांबवत आहोत. २८ तारखेपर्यंत आम्ही वाट पाहू. जर लाड यांचे म्हणणे मुख्यमंत्र्यांनी ऐकले नाही आणि मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर मात्र ३० मे पासून अंतरवालीत उपोषण निश्चित आहे; त्यानंतर पुढे काय होईल हे सांगता येत नाही.''

मनोज जरांगे पाटील यांच्या ४ प्रमुख मागण्याः

१. सातारा गॅझेटची अंमलबजावणीः सातारा संस्थानने काढलेल्या गॅझेटची तातडीने अंमलबजावणी करून त्यानुसार मराठा समाजाला प्रमाणपत्रे द्यावीत.

२. जात पडताळणी () सुलभ कराः ज्या मराठा बांधवांना कुणबी प्रमाणपत्रे मिळाली आहेत, त्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर करून ते तात्काळ द्यावेत.

३. ५८ लाख नोंदींचे वाटपः शोधण्यात आलेल्या ५८ लाख कुणबी नोंदींनुसार संबंधितांना त्वरित प्रमाणपत्रांचे वाटप व्हावे. ४. स्वतंत्र मंत्रालयः मराठा आणि कुणबी समाजाच्या प्रश्नांसाठी शासनाने स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना करावी.

३. प्रशासकीय काम सुरूच, चर्चेतून मार्ग काढू; मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचा खुलासा लाड-जरांगे भेटीनंतर

(पान २ वर)

# संपादकीय

## उष्माघाताचे संकट!

यंदाचा उन्हाळा केवळ घामाच्या धारा काढणारा नसून अंगाची लाहीलाही करणारा आणि जीवघेणा ठरू लागला आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण देश सध्या एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करत असून, तापमानाने चाळिशी केव्हाच ओलांडून आता ४७ अंशांच्या दिशेने कूच केली आहे.

महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील काही भागांतील नागरिकांना एका भीषण नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अनेक राज्यांमध्ये तापमानाचा उच्चांक पाहायला मिळत असून, नागरिक निसर्गाच्या अत्यंत दाहक आणि भीषण संकटाशी सामना करत आहेत. वैशाख वणव्याची दाहकता एप्रिलमध्येच जाणवू लागली असून, ४५ अंशांच्या पार गेलेल्या तापमानामुळे आभाळातून पावसाऐवजी आगीच्या ज्वाळाच खाली येत आहेत की काय, अशी भीषण स्थिती निर्माण झाली आहे.

उत्तर प्रदेशातील बांदा येथे देशातील सर्वाधिक ४७.६ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असून, उन्हाच्या तडाख्याने सीमा ओलांडली आहे. राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि मध्य प्रदेशासह पूर्व भारतातील पश्चिम बंगाल, बिहार आणि झारखंडमध्येही सूर्याचा प्रकोप जाणवत आहे. दक्षिण भारतात तेलंगणा, कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेशात उष्णतेच्या लाटेने धोक्याची पातळी ओलांडली. ओडिशामध्येही उष्णतेने उच्चांक गाठला आहे. दुसऱ्या बाजूला जम्मू-काश्मीरसारख्या थंड प्रदेशातही तापमानाचा पारा चढलेला दिसत असून, ही स्थिती काळजाचा ठोका चुकवणारी आहे. राज्यात नेहमीप्रमाणे विदर्भातील अकोला, चंद्रपूर आणि नागपूर या जिल्ह्यांत उष्णतेने कहर आहे. विशेषतः अकोल्याचा पारा ४६.९ अंशांवर पोहोचल्याने हे शहर उष्ण शहरांच्या यादीत स्थान वरच्या स्थानी आहे. केवळ विदर्भच नव्हे, तर मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातही उष्णतेच्या लाटेने नागरिकांची लाहीलाही होत आहे. उष्णतेच्या लाटांचा भूगोल आता वेगाने बदलत असून, उत्तर भारताकडून ही आग मध्य आणि दक्षिण भारताकडे सरकली आहे. अगदी हिमालयाच्या कुशीतील जम्मू-काश्मीरही या आगीतून सुटलेले नाही. ही उष्णता आता केवळ घामाच्या धारा काढणारी उरली नसून ती थेट जीव घेण्यावर टपली आहे.

# जागतिक कासव दिन

२३ मे हा दिवस संपूर्ण जगात जागतिक कासव दिन म्हणून साजरा केला जातो. १९९० पासून हा दिवस संपूर्ण जगात साजरा केला जातो. आपल्या संस्कृतीत कासवाला खूप मानाचे स्थान आहे. हिंदू संस्कृतीत तर कासवाला देवाचे रूप मानले जाते. हिंदू धर्माच्या मंदिराच्या बाहेर तर कासवाची प्रतिकृती आवर्जून असते. देवाचे दर्शन घेण्याआधी भाविक कासवाचे दर्शन घेतात. आपले पूर्वज कासवाचा सांभाळ करत असत. प्रत्येक नदी, विहीर, बारव तलावात कासव वास्तवात असे, पण आज कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. कारण शिकार, व्यापार आणि पाण्याच्या अभावामुळे कासवाचे अस्तित्व पणाला लागले आहे. अनेक दुर्मिळ जातींच्या कासवांचे अस्तित्व नष्ट झाले आहे. आज गोड्या पाण्यातून तर कासवे हद्दपारच झाले आहेत. कासवांचे अस्तित्व आता फक्त समुद्रातच पाहायला मिळते. कासव हा उभयचर प्राणी आहे.

पाणी आणि जमीन अशा दोन्ही ठिकाणी कासव राहू शकतो. कासवाचे पोट आणि पाठ खूप टणक असते. समुद्रात राहणाऱ्या कासवाचे सात प्रकार आहेत त्यापैकी भारतात चार प्रकार पाहायला मिळतात. ऑलिव्ह रिडले कासव, ग्रीन टर्टल, हॉक्स बिल टर्टल आणि आणि सागरी कासव हे ते चार प्रकार आहेत. ऑलिव्ह रिडले कासव हे तपकिरी रंगाचे असून ते महाराष्ट्र आणि ओरिसाच्या समुद्रकिनाऱ्यावर आढळतात. ग्रीन टर्टल कासव म्हणजे हिरव्या रंगाचे कासव हे पूर्व आणि पश्चिम किनाऱ्यावर आढळतात. हॉक्स बिल टर्टल म्हणजे चोची सारखे तोंड असलेले कासव अंदमान निकोबारच्या बेटावर आढळतात तर सागरी कासव हे सर्व समुद्रात आढळतात. समुद्रातील कासवांची देखील आता मोठ्या प्रमाणात शिकार होऊ लागली आहे. कासवांच्या पाठीचा दागिन्यांसाठी वापर केला जातो. तसेच कासवांच्या पाठिपासून ढालीही बनवल्या जातात.

चामड्याच्या तसेच शोभेच्या वस्तू बनवण्यासाठी कासवांच्या त्वचेचा वापर केला जातो. काहीजण आपल्या घरात शोभेसाठी कासव पाळतात. या सर्व कारणांनी कासवांची शिकार होते. कासवांची शिकार बेकायदेशीर असूनही कासवांची शिकार होते हे विशेष. कासवांचे संवर्धन करण्यासाठी वेळास येथे कासव संवर्धन केंद्र उभारण्यात आले आहे. वेळास येथे दरवर्षी कासव महोत्सवही आयोजित केला जातो. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ऑलिव्ह रिडले कासवांचे प्रजनन आणि संवर्धन होते. कासवांचे आयुष्य १०० ते १५० वर्ष इतके असते. मात्र शिकारीमुळे अनेक कासवे अकालीच मरण पावतात. कासवांचे अस्तित्व जमीन आणि पाण्यातील जीवनसाखळीसाठी अत्यंत महत्वाचे आहे. कासवांचे अस्तित्व टिकणे ही काळाची गरज आहे. जर पृथ्वीवरून कासवांचे अस्तित्व नष्ट झाले तर त्याचा पर्यावरणावर मोठा परिणाम होऊ शकतो. कासव हा वन्यजीव असल्याने त्याला घरात बंदिस्त करणे, त्याची हत्या करणे, शिकार करणे हे वन्यजीव कायद्यानुसार गुन्हे आहेत त्यामुळे असे गुन्हे करताना कोणी आढळल्यास त्याची पोलिसांकडे तक्रार करणे हे देशातील नागरिकांचे कर्तव्य आहे. कायद्याचे अस्तित्व टिकवण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे, कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हाच जागतिक कासव दिन साजरा करण्यामागचा उद्देश आहे. हा उदेश यशस्वी व्हावा असे वाटत असेल तर प्रत्येकाने कासवांचे संरक्षण आणि संवर्धन करायला हवे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त घनसावंगी येथे भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन



घनसावंगी (प्रतिनिधी) :महाराष्ट्र राज्यातील लाडक्या बहिणीचे भाऊ म्हणून ओळख असलेले उपमुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे यांचा वाढदिवस घनसावंगी विधानसभा मतदारसंघात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या वाढदिवसाच्या निमित्ताने घनसावंगी येथे दिनांक २४ मे २०२६ रोजी भव्य अशा आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या आरोग्य शिबिराचा घनसावंगी मतदारसंघातील जनतेने मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा असे आवाहन आरोग्य शिबिराचे मुख्य आयोजक घनसावंगी विधानसभा मतदारसंघाचे आमदार हिकमत उढाण यांनी केले आहे. सदरील आरोग्य शिबिर हे शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन, आरोग्यदूत फाउंडेशन व रत्ना निधी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडणार आहे. या आरोग्य शिबिरामध्ये लहान मुलांसाठी मोफत २ इको तपासणी तसेच हृदय शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले असून दिव्यांग बांधवांसाठी मोफत मॉड्युलर हात व पाय वाटप ही आरोग्य शिबिरात करण्यात येणार आहे.

हे शिबिर रविवार दि. २४ मे २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत उपजिल्हा रुग्णालय, घनसावंगी येथे होणार आहे.

## महाराष्ट्र मंदिर महासंघाचे प्रसिद्धीपत्रक !

# राज्यातील हजारो मंदिरांचा एल्गार; देवस्थान इनाम निर्मूलन; मसुधाविरोधात ठिकठिकाणी दंड थोपटले!

**मुंबई -वृत्तसेवा**
महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने प्रस्तावित केलेला 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम, २०२६' हा राज्यातील हजारो हिंदू देवस्थानांच्या जमिनी हिरावून घेणारा आणि त्यांचे अस्तित्व धोक्यात आणणारा आहे. सरकार येत्या पावसाळी अधिवेशनात हा कायदा करण्याच्या तयारीत असल्यामुळे, या अन्यायी कायद्याविरोधात महाराष्ट्र मंदिर महासंघासह राज्यातील अष्टविनायक मंदिरे आणि सर्वच प्रमुख मंदिरांचे १,००० हून अधिक विश्वस्त, मंदिर प्रतिनिधी आणि हिंदू संघटनांनी दंड थोपटले आहेत.

या कायद्याच्या निषेधार्थ राज्यभरातील मंदिर विश्वस्तांनी थेट माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, अनेक मंत्री, राज्यमंत्री, आमदार तसेच सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी आणि तहसीलदार यांना एकाच वेळी ३०० हून अधिक निवेदने सुपूर्द केली आहेत. हिंदू देवस्थानांचे अस्तित्व संपवणारा हा जुलमी कायदा सरकारने विनाअट त्वरित मागे घ्यावा, अशी एकमुखी मागणी या निवेदनांद्वारे करण्यात आली आहे. या जनक्षोभाची गंभीर दखल घेत, राज्यातील अनेक आमदारांनीही जनभावनांचा आदर करत ''येत्या पावसाळी अधिवेशनात या कायद्याला विरोध करू'', अशी ठाम भूमिका मंदिर प्रतिनिधींकडे मांडली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, छत्रपती शिवाजी महाराज आणि ऐतिहासिक राजघराण्यांनी मंदिरांच्या नैवेद्य, अन्नछत्र व उत्सव यांसाठी शेकडो एकर जमिनी इनाम म्हणून मंदिराच्या नावावर केल्या होत्या. प्रस्तावित कायद्याच्या कलम ३ आणि ४ मुळे ही सर्व इनामे एक झटक्यात रद्द करून, या देवाला दान केलेल्या जमिनी खासगी व्यक्तींच्या घशात घालण्याचा डाव आहे. या कायद्यातील कलम १ (उपकलम २) अत्यंत पक्षपाती आहे. याद्वारे वक्फ बोर्डाच्या जमिनींना या कायद्यातून पूर्णपणे वगळून विशेष संरक्षण देण्यात आले आहे. एकीकडे हिंदू मंदिरांच्या जमिनी काढून घेतल्या जात आहेत आणि ज्या वक्फने हजारो हिंदूंच्या जमिनी बेकायदेशीरपणे लाटल्या आहेत, त्या वक्फच्या जमिनींना संरक्षण दिले जात आहे. हा धार्मिक भेदभाव हिंदूंच्याच मतांवर निवडून आलेले सरकार करत आहे, हे दुर्दैव आहे. या मसुद्यातील कलम १८ नुसार, महसूल अधिकाऱ्यांच्या कोणत्याही मनमानी निर्णयाविरोधात भाविक किंवा विश्वस्तांना दिवाणी न्यायालयात दाद मागता येणार नाही. म्हणजे हिंदूंसाठी लोकशाहीत न्यायालयाचे दरवाजे बंद केले जात आहेत. देवस्थानच्या जमिनींवरील बेकायदेशीर अतिक्रमणे हटवण्याऐवजी, १ जानेवारी २०११ पूर्वीच्या अतिक्रमणधारकांना थेट मालकी हक्क बहाल करणे म्हणजे देवस्थानच्या पवित्र मालमत्तेची कायदेशीर लूट करण्यासारखेच आहे. या राज्यव्यापी आंदोलनाची गंभीर दखल घेत रत्नागिरीचे पालकमंत्री ना. उदय सामंत यांनी 'सदर कायदा करू नये' म्हणून मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिण्याचे आश्वासन दिले आहे. तसेच मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी स्वतः मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मा. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या कायद्याला तीव्र विरोध दर्शवला आहे. यावर मा. मुख्यमंत्री व मा. उपमुख्यमंत्री यांनी महसूलमंत्र्यांसोबत तात्काळ बैठक घेऊ, असे सांगितले आहे.

पान १ व ४ वरुन

### जुना जालन्यात...

पळ काढला. जखमी महिलेला तातडीने जालना येथील निरामय हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून, तिची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.
पाच जणांविरोधात एसपींकडे लेखी तक्रार या हिंसक हल्ल्याप्रकरणी शेख सलीम शेख मोईद्दीन यांनी जालना जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे लेखी तक्रार दिली असून आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली आहे. तक्रारीमध्ये पुढील संशयितांची नावे नमूद करण्यात आली आहेतः समीरखान जफरखान शेख रईस शेख इब्राहीम रफीक शेख इब्राहीम
अकबर शेख इब्राहीम शेख अतिक शेख जावेद (सर्व राहणार, संजय नगर, जुना जालना).
कदीम पोलिसांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह या संपूर्ण प्रकरणात पोलिसांच्या कार्यपद्धतीवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. हल्ल्यानंतर पीडित कुटुंब रक्ताच्या थारोळ्यात असलेल्या महिलेला घेऊन आणि स्वतः गंभीर जखमी अवस्थेत कदीम जालना पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेले होते. मात्र, कदीम जालना पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेण्यास साफ नकार दिला, असा थेट आरोप तक्रारदाराने केला आहे. ''आरोपी मोकाट असून ते आम्हाला आणि आमच्या कुटुंबाला सतत जीवे मारण्याच्या धमक्या देत आहेत, त्यामुळे आमचे संपूर्ण कुटुंब भीतीच्या छायेत जगत आहे,'' असे शेख सलीम यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे. थरारक व्हिडिओमुळे पोलिसांवरील दबाव वाढला दरम्यान, या गुंडगिरीचा आणि हातात कोयता घेऊन फिरणाऱ्या हल्लेखोरांचा एक थरारक व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओमध्ये हल्लेखोर उघडपणे शस्त्रांची दहशत माजवत असल्याचे स्पष्ट दिसत आहे. हा व्हिडिओ पुरावा म्हणून पोलीस अधीक्षकांसमोर सादर करण्यात आला आहे. भरदिवसा घरात घुसून महिलेवर कोयता हल्ला झाल्याची घटना आणि त्याचा व्हिडिओ समोर आल्याने जालन्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, आता पोलीस अधीक्षक या प्रकरणी कदीम पोलिसांना काय आदेश देतात आणि आरोपींवर कधी कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या...

कर्मचाऱ्यांच्या घरांचे पत्ते वास्तव्यास म्हणून दाखविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्ष पाहणी, ग्रामस्थांचे निवेदन व आंदोलनादरम्यान सादर केलेल्या पुराव्यांवरून संबंधित अधिकारी त्या ठिकाणी वास्तव्यास राहत नसल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या ठरावांच्या प्रती व ग्रामपंचायत कार्यालयातील मूळ दप्तरातील नोंदी यामध्ये तफावत असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. ठराव क्रमांक, तारीख, बैठकीस उपस्थित सदस्य, अनुमोदक, सूचक व ग्रामसभा नोंदींची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

काही ठिकाणी नंतरच्या तारखांना नोंदी लिहिणे, फेरफार करणे किंवा बनावट नोंदी करण्यात आल्याचा संशयही निवेदनात व्यक्त करण्यात आला आहे. संभाजी ब्रिगेडने या प्रकरणाची केवळ कागदोपत्री चौकशी न करता प्रत्यक्ष व निष्पक्ष तपास करण्याची मागणी केली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी ज्या ठिकाणी वास्तव्यास असल्याचे नमूद केले आहे त्या ठिकाणी अचानक भेट, रात्रीची तपासणी, पंचनामा, वीज व पाणी वापर, मोबाईल लोकेशन, सीसीटीव्ही फुटेज व इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.
चौकशीदरम्यान पुरावे नष्ट होण्याची किंवा कागदपत्रांमध्ये फेरफार होण्याची शक्यता लक्षात घेता चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित अधिकाऱ्यांवर मुख्यालय न सोडण्याबाबत प्रशासकीय निर्बंध लावावेत, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे. दरम्यान, प्रशासनाने तात्काळ व निष्पक्ष कारवाई न केल्यास पंचायत समिती कार्यालयासमोर तीव्र लोकशाही आंदोलन छेडण्याचा इशाराही संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष शिवश्री बालासाहेब भगवान खवणे यांनी दिला आहे.

### नीट पेपर फुटीतील...

तात्काळ अटक करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच या प्रकरणातील मुख्य सूत्रधार, दलाल आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करून त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी परीक्षा व्यवस्थेत पारदर्शकता आणून सुरक्षा यंत्रणा अधिक मजबूत करण्याची गरज असल्याचेही गणेश गिराम यांनी सांगितले.

### अशोक खरात...

असता, त्याचा प्रसार व प्रचार झाला असता तर पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात भोंदूगिरीचे निश्चितपणे निर्मूलन झाले असते, मात्र सरकारच अंधश्रद्धेला खतपाणी घालत असल्याने महाराष्ट्रात भोंदूगिरी व बुवाबाजीचे प्रमाण वाढले असल्याची टीका प्रा. मानव यांनी केली. जादूटोणाविरोधी कायद्याचा प्रसार व प्रचारासाठी अपेक्षित एवढा निधी राज्य सरकार उपलब्ध करून देत नाही, अंधश्रद्धा निर्मूलनासाठीचे कोणतेही प्रशिक्षण नसलेल्या सेवाभावी संस्थावर राज्य सरकारने जादूटोणाविरोधी कायद्याचा प्रसार व प्रचाराची जबाबदारी सोपवावी, ही आश्चर्याची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

### भटक्या कुत्र्यांचा हल्ला...

हरणाची अवस्था पाहून त्यांनी तातडीने भोकरदन येथे कार्यरत वनरक्षक ज्ञानेश्वर पवार यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधून संपूर्ण घटनेची माहिती दिली.मानवतेचा जिवंत प्रत्यय देणाऱ्या या घटनेमुळे परिसरात या सर्वांचे कौतुक होत असून,माणुसकी अजून जिवंत आहे. अशी भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.वन्यजीवांप्रती संवेदनशीलता आणि सामाजिक बांधिलकी दाखवणाऱ्या या धाडसी कृतीमुळे भोकरदनमध्ये या टीमवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### अंतरावलीत...

राजकीय वर्तुळात वेगाने सूत्रे हलली. या संपूर्ण घडामोडींवर मराठा आरक्षण उपसमितीचे महत्त्वाचे सदस्य आणि महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सरकारची अधिकृत बाजू मांडली.
शिंदे समितीबाबत स्पष्टीकरण: विखे-पाटील म्हणाले की, जरांगे पाटील यांच्या मागणीनुसारच न्यायमूर्ती शिंदे समितीला वर्षभरापूर्वी मुदतवाढ देण्यात आली होती. आता न्यायमूर्ती शिंदे यांची लोकायुक्त म्हणून नियुक्ती झाली असली, तरी त्यापूर्वी त्यांनी त्यांच्या ताब्यातील काम जबाबदारीने पूर्ण केले असल्याचे आश्वासन सरकारला दिले आहे.
माहितीमध्ये विसंगती असण्याची शक्यता: हैदराबाद आणि सातारा गॅझेटच्या अंमलबजावणीचे काम प्रशासकीय पातळीवर सुरूच आहे. शासनाकडून होणारी कारवाई आणि जरांगे पाटील यांच्यापर्यंत पोहोचणारी माहिती यात काही विसंगती किंवा कम्युनिकेशन गॅप आहे का, हे तपासावे लागेल. फडणवीसांवरील आरोपांचे खंडन: ''देवेंद्र फडणवीस सहकार्य करत नाहीत'' या जरांगे यांच्या आरोपाचा विखे-पाटलांनी इन्कार केला. ''मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकारानेच सरकार या आंदोलनाला सामोरे जात आहे. समितीचा अध्यक्ष म्हणून मी जेव्हा काम करतो, तेव्हा मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सातत्याने याचा आढावा घेतात. दाखले लवकर देण्याबाबत त्यांचा नेहमीच आग्रह असतो. मात्र, काही गोष्टी कायद्याच्या चौकटीत राहून कराव्या लागतात, त्याला प्रशासकीय मर्यादा असतात,'' असे ते म्हणाले. पुढे काय? संपूर्ण राज्याचे लक्ष २८ मे कडे! आमदार प्रसाद लाड यांच्या मध्यस्थीमुळे तूर्त आंदोलनाचा संघर्ष काही दिवसांसाठी टळला असला तरी जरांगे पाटील आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. आता मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनीही स्वतः जरांगे पाटील यांची भेट घेणार असल्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे २८ मे रोजी राज्य सरकार मराठा आरक्षण उपसमितीच्या माध्यमातून काय निर्णय जाहीर करते आणि २९ मे रोजी प्रसाद लाड अंतरवालीत काय निरोप घेऊन येतात, यावरच ३० मे रोजी महाराष्ट्रात पुन्हा आंदोलन पेटणार की शांतता राहणार, याचा फैसला होणार आहे.

### चंदीगडच्या प्रदूषणावर...


ॲड. धन्नावत पुढे म्हणाले की, ङ्ङजालना आणि महाराष्ट्रातील इतर शहरांनी वायू प्रदूषणाच्या स्रोतांवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक मजबूत आणि पारदर्शक यंत्रणा विकसित केली पाहिजे. वाहनांचे उत्सर्जन, बांधकामाच्या ठिकाणी उडणारी धूळ आणि औद्योगिक प्रदूषण यावर कठोर नियमांची अंमलबजावणी व्हायला हवी. या प्रकरणाप्रमाणेच, आपल्या शहरांमधील वायू गुणवत्तेची नियमित आकडेवारी गोळा करून ती जनतेसाठी खुली करणे आवश्यक आहे, जेणेकरून प्रशासनावर दबाव निर्माण होईल. स्वच्छ आणि निरोगी पर्यावरणात जगण्याचा अधिकार हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे आणि तो जपण्याची जबाबदारी सरकार आणि प्रशासन दोघांचीही आहे. हा खटला म्हणजे शहरी नियोजक आणि पर्यावरण संरक्षण संस्थांसाठी एक तेचा इशारा आहे.

### तीन वर्षांच्या...

तातडीने धाव घ्यावी लागली. प्रभाग क्रमांक १२ चे नगरसेवक अनिल तिरुखे आणि नगरसेवक सुनील बोर्डे यांनी तातडीने सत्यम नगर गाठले. त्यांनी संबंधित विभागाच्या मनपा अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलावून घेत धारेवर धरले आणि कामात कसूर करणाऱ्यांना खडेबोल सुनावले. यानंतर लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत मनपा कर्मचाऱ्यांनी युद्धपातळीवर पाईपलाईन दुरुस्तीचे काम हाती घेतले. गेल्या तीन वर्षांपासून प्रलंबित असलेले पाईपलाईन लिकेज अखेर शोधून ते दुरुस्त करण्यात आले.
गुरुवारी रात्री उशिरा सुटले पाणी; महिलांच्या चेहऱ्यावर आनंद
तांत्रिक अडचणी दूर झाल्यानंतर, गुरुवारी (२१ मे) रात्री उशिरा सत्यम नगर परिसरात नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला. तब्बल तीन वर्षांनंतर घरासमोरील नळाला पाणी आलेले पाहून महिलांच्या चेहऱ्यावर आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले. पाण्याचा पहिला हंडा भरताना महिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले होते. यानंतर नागरिकांनी नगरसेवक अनिल तिरुखे यांचे मनःपूर्वक आभार मानले.
ङ्ङपाणी आल्याचा आनंद नक्कीच आहे, पण प्रशासनाने आता पुन्हा निष्काळजीपणा न दाखवता येथे कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, जेणेकरून भविष्यात पुन्हा अशी वेळ येणार नाही.ङ्ङ
सत्यम नगरमधील स्थानिक महिला रहिवासी
नगरसेवकांकडून स्वतः मोटरमध्ये पाणी भरून पाहणी
विशेष म्हणजे, केवळ पाणी सोडले एवढ्यावरच न थांबता नगरसेवक अनिल तिरुखे यांनी स्वतः भर उन्हात संपूर्ण परिसरात फेरफटका मारला. प्रत्येक गल्लीत आणि प्रत्येक घरात पाणी योग्य दाबाने पोहोचत आहे का, याची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. काही घरांमध्ये तांत्रिक कारणामुळे पाणी पोहोचत नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यावर त्यांनी स्वतः पुढाकार घेत मोटरमध्ये पाणी भरून आणि तांत्रिक बिघाड जागीच दुरुस्त करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या ऑन द स्पॉट कार्यपद्धतीचे नागरिकांमधून कौतुक होत आहे.
खोदलेले रस्ते तातडीने बुजवण्याची मागणी
पाणीपुरवठा सुरू झाल्याने आनंद असला, तरी दुरुस्तीच्या कामासाठी परिसरात अनेक ठिकाणी रस्ते खोदण्यात आले आहेत आणि मोठे खड्डे पडले आहेत. हे खड्डे भविष्यात अपघाताला कारणीभूत ठरू शकतात, त्यामुळे मनपा प्रशासनाने हे रस्ते तातडीने पूर्ववत करावेत, अशी मागणी आता नागरिकांकडून केली जात आहे.
एकंदरीत, स्थानिक महिलांची एकजूट, माध्यमांनी दिलेली साथ आणि लोकप्रतिनिधींनी दाखवलेली तत्परता यामुळे तीन वर्षांचा पाण्याचा वनवास संपला असून, सत्यम नगरमध्ये सध्या समाधानाचे वातावरण आहे.

# मकरंद अनासपुरे, जितेंद्र जोशी यांचा रहस्य आणि कॉमेडीचा भन्नाट तडका असलेल्या ‘ तुंबाडची मंजुळा ’ चा ट्रेलर प्रदर्शित

सध्या सर्वत्र चर्चेचा विषय असलेला ,आपल्या पोस्टर, टिझर आणि गाण्यांमधून प्रचंड उत्सुकता निर्माण केलेल्या झी स्टुडिओजची निर्मिती असलेल्या तुंबाडची मंजुळा या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीस आला असून त्यातून या चित्रपटाबद्दलची उत्कंठा अजूनच जास्त वाढली आहे. रहस्य, भीती , गुढता आणि त्याच्या सोबतीला एकाहून एक अतरंगी गावकऱ्यांची धमाल गोष्ट या ट्रेलरमधून बघायला मिळत असल्याने एक परिपूर्ण मनोरंजक चित्रपटाची मेजवानी मिळणार असल्याची चर्चा प्रेक्षक सोशल मीडियावर करत आहेत. मुंबईत नुकत्याच पार पडलेल्या एका दिमाखदार सोहळ्यात या चित्रपटाचा ट्रेलर अनेक मान्यवरांच्या आणि कलाकारांच्या उपस्थितीत प्रदर्शित करण्यात आला. चित्रपटात आजीच्या भूमिकेत दिसणाऱ्या उषा नाडकर्णी यांच्या निवेदनातून आपण या गावात आणि त्या विश्वात प्रवेश करतो. या ट्रेलरमध्ये गावाची आणि तिथल्या व्यक्तिरेखांची ओळख करून देताना त्यांच्या खास शैलीतील निवेदनामुळे ट्रेलरला एक वेगळीच रंगत आली आहे. यामध्ये एक गाव, त्यातील गावकरी, त्यांच्यावर घोंगावणारं एक अदृश्य संकट आणि त्यातून घडणाऱ्या असामान्य घटनांची झलक पाहायला मिळते. जरी चित्रपटाला भयपटाची पार्श्वभूमी असली, तरी हा चित्रपट निखळ विनोद आणि भरभरून मनोरंजनाचा अनुभव देणारा





असल्याचं ट्रेलरमधून स्पष्ट होतं. मकरंद अनासपुरे, जितेंद्र जोशी , ओम भुतकर, अंशुमन विचारे, योगेश शिरसाट, गणेश पंडीत, शार्दूल सराफ यांच्यासोबत इतर कलाकारांचा सहजसुंदर अभिनय, विनोदाचं अचूक टायमिंग, सोबतीला असलेले भन्नाट संवाद यातून या गोष्टीची आणि या गावाची अतरंगी झलक आपल्या बघायला मिळते. पण सोबतीनेच ट्रेलरच्या उत्तरार्धात एका गुढ वलयात दिसणारी सई ताम्हणकर सर्वांचं लक्ष वेधून घेते. तिचं नेमकं पात्र काय आहे ?तिच्या गुढतेमागची गोष्ट काय आहे ? असा विचार हा ट्रेलर बघणाऱ्या प्रत्येक प्रेक्षकाच्या मनात येतो आणि या कथेबद्दलची उत्कंठा वाढवतो. रहस्य उलगडण्याच्या प्रवासात प्रेक्षकांना खळखळून हसवतानाच पुढे काय घडणार याची उत्सुकता कायम ठेवण्यात ट्रेलर यशस्वी ठरताना दिसत आहे. दिग्दर्शक विविध कोरेगांवकर म्हणतात, करीअरच्या सुरुवातीलाच एवढ्या मोठ्या चित्रपटाचं दिग्दर्शन करायची संधी मिळणं ही माझ्यासाठी अत्यंत मोठी गोष्ट आहे. झी स्टुडिओज मराठीचे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर यांनी माझ्यावर विश्वास टाकत ही संधी मला दिली त्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो. हा चित्रपट प्रेक्षकांना एका वेगळ्या आणि अनोख्या विश्वात घेऊन जाणारा अनुभव आहे. हा चित्रपट तयार करताना आम्ही प्रत्येक पात्र, त्याची शैली आणि प्रत्येक प्रसंग वेगळ्या पद्धतीने उभा करण्याचा प्रयत्न केला आहे. ट्रेलरमधून आम्ही एक छोटीशी झलक दाखवली आहे.

तुंबाडची मंजुळा प्रेक्षकांना नक्की आवडेल, याची आम्हाला खात्री आहे.

झी स्टुडियोजचे व्यवसाय प्रमुख बवेश जानवलेकर म्हणतात, तुंबाडची मंजुळा हा खऱ्या अर्थाने पूर्णपणे झी स्टुडिओजची निर्मिती असलेला चित्रपट आहे त्यामुळे आमच्यासाठी त्याचं विशेष महत्त्व आहे. आपल्या प्रेक्षकांना एक परीपूर्ण मनोरंजन देण्याचा आमचा प्रयत्न आहे. एकाहून एक दिग्गज कलाकार , गुढता आणि रहस्याभोवती फिरणाऱ्या गोष्टीला दिलेला विनोदाचा तडका , श्रवणीय संगीत असे मनोरंजनाचे विविध पैलू यात प्रेक्षकांना बघायला मिळतील. सध्या प्रेक्षकांना मनोरंजनासोबत काहीतरी वेगळं आणि ताजं पाहायचं आहे आणि हा चित्रपट त्याच अपेक्षांवर नक्कीच खरा उतरेल, असा विश्वास आम्हाला आहे. रहस्य, विनोद आणि कलाकारांची भन्नाट केमिस्ट्री यामुळे हा चित्रपट सर्व वयोगटातील प्रेक्षकांना आपलासा वाटेल.'' रहस्य, विनोद आणि दमदार कथानकाची मेजवानी घेऊन येणारा 'तुंबाडची मंजुळा' हा चित्रपट आता ५ जून रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. विविध कोरगांवकर दिग्दर्शित या चित्रपटाची कथा आणि लेखन ऋषिकेश तुरई यांनी केले असून झी स्टुडिओज प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती उमेश कुमार बन्सल आणि बवेश जानवलेकर यांनी केली आहे.

# एक झाड म्हणजे हजारो श्वास..!




**भोकरदन -प्रतिनिधी**

सध्या वाढत असलेले वायू प्रदूषण, दूषित पाणी,ध्वनी प्रदूषण तसेच मोठ्या प्रमाणावर होणारी वृक्षतोड यामुळे मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते तथा डॉ. रामेश्वर वरकड यांनी दिला आहे.आजच्या काळात श्वसनाचे विकार, दमा, फुफ्फुसांचे आजार, हृदयविकार, त्वचारोग आणि मानसिक ताणतणाव यांसारख्या समस्या वाढत्या प्रमाणात दिसून येत आहेत. वातावरणातील विषारी धूर,दूषित पाणी आणि ध्वनी प्रदूषणामुळे मानवी शरीरावर घातक परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ध्वनी प्रदूषणामुळे मानसिक आरोग्यावरही परिणाम होत असून, निद्रानाश, चिडचिड आणि मानसिक अस्थिरता वाढत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याची गरज असल्याचे सांगत त्यांनी वृक्षतोड थांबवणे,मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करणे,दूषित सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावणे,प्लास्टिकचा कमी वापर करणे आणि ध्वनी प्रदूषण रोखणे आवश्यक असल्याचे नमूद केले.

एक झाड लावणे म्हणजे भविष्यातील एका कुटुंबाचा श्वास सुरक्षित करणे होय असेही त्यांनी सांगितले.प्रदूषणमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी शासनासोबतच प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

# ऊसतोड कामगार कुटुंबांसाठी बोरगाव तांड्यात आरोग्य शिबिर संपन्न

घनसावंगी (प्रतिनिधी) : बोरगाव तांडा (ता. घनसावंगी) येथे स्थलांतरित ऊसतोड कामगार कुटुंबातील नागरिक गावात परत आल्यानंतर त्यांना वेळेवर आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी या उद्देशाने विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास ऊसतोड कामगार कुटुंबातील महिला, पुरुष, बालके व युवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.

शिबिरामध्ये नागरिकांची प्राथमिक आरोग्य तपासणी करण्यात आली तसेच आरोग्य विषयक विविध बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले. महिलांचे आरोग्य, बालकांचे पोषण, नियमित आरोग्य तपासणी, लसीकरण, स्वच्छता, सुरक्षित पिण्याचे पाणी आणि संसर्गजन्य आजारांपासून बचाव याबाबत जनजागृती करण्यात आली. यावेळी डॉ. मनीषा खोतकर यांनी आरोग्य तपासणी करून योग्य आहार, नियमित उपचार आणि आरोग्याची काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन केले. अनुजा देवकर यांनी महिला व बाल आरोग्य, / सेवा आणि लसीकरणाचे महत्त्व सांगितले. तसेच एस. डी. घोगरे व एच. सी. सिंगीरे यांनी प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, स्वच्छता आणि शासकीय आरोग्य योजनांची माहिती दिली.

या उपक्रमामध्ये आरोग्य व पोषण समितीच्या सदस्यांनी सक्रिय सहभाग घेतला. स्थलांतरित ऊसतोड कामगार कुटुंबांना गावपातळीवर आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी अशा शिबिरांचे नियमित आयोजन करण्याची गरज उपस्थितांनी व्यक्त केली.

आरोग्य विभाग आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्था छत्रपती संभाजी नगर यांच्या सहकार्याने यावेळी सुरेखा वाघमारे, राजेश वाघमारे यांनी आरोग्य शिबिराचे नियोजन केले.

सदर शिबिरामुळे नागरिकांमध्ये आरोग्य व पोषणाबाबत जागरूकता निर्माण झाली असून भविष्यातही अशाच आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.



### महानगरपालिकेत दोन नगरसेवकांमध्ये हाणामारी

# खासदार डॉ. कल्याण काळे यांचे पोलीस अधीक्षकांना निवेदन, कठोर कारवाईची मागणी

**जालना -प्रतिनिधी**

जालना महानगरपालिका कार्यालयातील मा. महापौर यांच्या दालनात दिनांक ११ मे २०२६ रोजी दोन नगरसेवकांमध्ये झालेल्या गंभीर मारहाण व हाणामारीच्या घटनेमुळे जिल्हाभरात प्रचंड खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत जालना जिल्ह्याचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांना एक सविस्तर निवेदन सादर केले असून, या प्रकरणातील दोषींवर कोणतीही कययलोट न करता कठोर आणि निष्पक्ष कारवाई करण्याची आग्रही मागणी केली आहे.

**घातक शस्त्रांचा वापर; शासकीय कार्यालयाची शांतता भंग**

समोर आलेल्या माहितीनुसार, महापौर दालनात झालेल्या या वादादरम्यान लोखंडी रॉड, खंजीर यांसारख्या अत्यंत घातक शस्त्रांचा उघडपणे वापर करण्यात आला. सार्वजनिक आणि महत्त्वाच्या शासकीय कार्यालयात अशा प्रकारचा सशस्त्र हिंसाचार घडणे ही अत्यंत धक्कादायक आणि गंभीर बाब असल्याचे खासदार डॉ. काळे यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे. महानगरपालिका हा लोकशाहीचा आणि जनतेच्या सेवेचा मुख्य कणा आहे, मात्र अशा घटनांमुळे मनपा परिसरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला असून, कार्यालयात येणाऱ्या सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे व दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



**गुन्हे दाखल, मात्र १२ दिवसांनंतरही पोलीस कारवाई थंडावलेलीच!**

या दुर्दैवी घटनेनंतर संबंधित दोन्ही बाजूंच्या नगरसेवकांकडून परस्परांविरुद्ध पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये भारतीय न्याय संहितेअंतर्गत () जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, घातक शस्त्रांचा वापर करणे, गंभीर दुखापत पोहचवणे तसेच सार्वजनिक शासकीय कार्यालयातील शांतता भंग करणे यांसारखी अत्यंत गंभीर आणि अजामीनपात्र कलमे लावण्यात आली आहेत. घटना घडून जवळपास १२ दिवस उलटून गेले आहेत. इतका मोठा कालावधी उलटूनही अद्याप आरोपींवर कोणतीही प्रभावी किंवा ठोस कारवाई झालेली नाही, ही बाब अत्यंत खेदजनक असल्याचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी स्पष्ट केले आहे.

तडजोडीचे प्रयत्न आणि तपासात हस्तक्षेपाची शक्यता या गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांमध्ये पडद्यामागून मोठ्या प्रमाणावर राजकीय व सामाजिक तडजोडी करण्याचे प्रयत्न सुरू असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. तडजोडीच्या माध्यमातून हे प्रकरण दाबण्याचा किंवा मागे घेण्याचा प्रयत्न होत असल्याचा संशय व्यक्त करत, खासदार डॉ. काळे यांनी पोलीस प्रशासनाला इशारा दिला आहे की, अशा दबावामुळे न्यायालयीन प्रक्रिया आणि पोलीस तपास यांना अजिबात बाधा पोहोचणार नाही, याची कडक दक्षता घेणे पोलीस प्रशासनाचे कर्तव्य आहे.

**खासदार डॉ. कल्याण काळे यांच्या प्रमुख मागण्या**

पोलीस प्रशासनाने कायद्याचा धाक कायम राखण्यासाठी तात्काळ पावले उचलावीत, यासाठी खासदारांनी निवेदनात खालील प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. तात्काळ कायदेशीर कारवाई: राजकीय किंवा सामाजिक दबावाला बळी न पडता सर्व आरोपींवर अत्यंत निष्पक्ष, पारदर्शक आणि तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

या प्रकरणाचा तपास संवेदनशील असल्यामुळे तो वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली चालवला जावा. सखोल चौकशी: शासकीय दालनात घातक शस्त्रे आली कशी? आणि या हिंसाचारामागे नेमके काय कारण होते, याची सखोल चौकशी व्हावी. कोणत्याही राजकीय किंवा बाह्य दबावाखाली पोलीस तपास प्रक्रियेत हस्तक्षेप होणार नाही, याची संपूर्ण दक्षता घेतली जावी.

सुरक्षा उपाययोजना: भविष्यात लोकशाहीच्या या पवित्र मंदिरांमध्ये अशा प्रकारच्या हिंसक घटना घडू नयेत, यासाठी महानगरपालिका परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था व आवश्यक उपाययोजना तात्काळ लागू कराव्यात. लोकशाही व्यवस्थेतील सार्वजनिक संस्थांमध्ये अशा प्रकारे हिंसाचार होणे अत्यंत दुर्दैवी असून गुन्हेगारांमध्ये कायद्याचा व पोलिसांचा धाक असणे गरजेचे आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

हे निवेदन देतेवेळी खासदार डॉ. कल्याण काळे यांच्यासोबत महानगर जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे, रघुवीर गुडे, दिनेश सुराणा, शमशोद्दीन शेख, बाबासाहेब सोनवणे, नारायण वाडेकर, सुरज येलगंटीवार, वसीम कादिर, अंकुश शिंदे, भारत लोढा यांसह अन्य प्रमुख पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आता या संवेदनशील प्रकरणात जालना पोलीस प्रशासन काय पावले उचलते आणि आरोपींच्या मुसक्या कधी आवळते, याकडे संपूर्ण जालना जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

---

### जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली 'पुतळा समितीची' आढावा बैठक

जालना-प्रतिनिधी

जिल्ह्यातील पुतळे आणि स्मारकांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आज 'पुतळा समिती'ची आढावा बैठक पार पडली. यावेळी बैठकीस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल तसेच विविध संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बैठकीत मुख्यत्वे जिल्ह्यातील सर्व सार्वजनिक पुतळ्यांच्या परिसरातील कायदा, सुव्यवस्था आणि सुरक्षिततेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. संवेदनशील ठिकाणांवर विशेष पोलीस गस्त ठेवण्याबाबत तसेच सीसीटीव्ही () यंत्रणा प्रभावीपणे कार्यान्वित करण्याबाबत पोलीस अधीक्षकांशी चर्चा झाली. जिल्हाधिकारी यांनी महापुरुष आणि क्रांतीकारकांच्या पुतळ्यांच्या परिसराची नियमित स्वच्छता, रंगरंगोटी व योग्य देखभाल राखण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना तातडीने आवश्यक सूचना देण्याचे निर्देश दिले. याशिवाय, कोणत्याही ठिकाणी नियमांचे उल्लंघन करून किंवा विनापरवाना पुतळे उभारले जाणार नाहीत, याची दक्षता प्रशासनाने घेण्याचे आदेशही जिल्हाधिकारी यांनी दिले.

बैठकीत प्रशासनाने पुतळ्यांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करत असल्याचे स्पष्ट केले असून, नागरिकांनी देखील या नियमांचे पालन करण्यास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

---

# तीन वर्षांच्या वनवासानंतर अखेर सत्यम नगरला नळाचे पाणी!

### महिलांच्या 'हंडा मोर्चा'ला मोठे यश

**जालना -प्रतिनिधी**

चंदनझीरा परिसरातील सत्यम नगरमध्ये गेल्या तब्बल तीन वर्षांपासून सुरू असलेल्या भीषण पाणीटंचाईला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. पाण्यासाठी मैलोन्मैल भटकंती करणाऱ्या आणि प्रशासकीय उदासीनतेचा सामना करणाऱ्या स्थानिक महिलांनी भर उन्हात रिकाम्या हंड्यांसह रस्त्यावर उतरून दिलेल्या तीव्र लढ्याला अखेर यश आले आहे. या आंदोलनानंतर खडबडून जागे झालेल्या प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी तातडीने हालचाली करत बंद पडलेला पाणीपुरवठा तांत्रिक दुरुस्ती करून पुन्हा सुरू केला आहे. यामुळे परिसरातील शेकडो कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला असून नागरिकांनी सुटकेचा श्वास सोडला आहे.

पाईपलाईन लिकेज ठरले होते मुख्य कारण सत्यम नगरमधील तीन ते चार गल्ल्यांमध्ये गेल्या तीन वर्षांपासून पाईपलाईन लिकेजची मोठी समस्या निर्माण झाली होती. यामुळे या गल्ल्यांमधील अनेक घरांपर्यंत पाण्याचा दाब पोहोचत नव्हता आणि नियमित पाणी पुरवठा खंडित झाला होता. स्थानिक नागरिकांनी, विशेषतः महिलांनी वारंवार महानगरपालिका प्रशासनाकडे चकरा मारून, लेखी तक्रारी देऊनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई केली जात नव्हती. ''कर भरूनही पाणी का नाही?'' असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत होते.



महिलांचा संताप अनावर; काढला 'हंडा मोर्चा' प्रशासनाच्या सातत्यपूर्ण दुर्लक्षामुळे सत्यम नगरमधील महिलांचा संताप अनावर झाला. काही दिवसांपूर्वीच या भागातील शेकडो महिलांनी डोक्यावर रिकामे हंडे घेऊन रस्त्यावर उतरत महानगरपालिका प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. ''आम्हाला पाणी विकतच घ्यायचं असेल तर महानगरपालिकेचा उपयोग काय?'' असा थेट आणि रोकडा सवाल करत महिलांनी चंदनझीरा परिसरात जोरदार घोषणाबाजी केली. या हंडा मोर्चाने प्रशासनाचे चांगलेच धाबे दणाणले. स्थानिक माध्यमांनीही या आंदोलनाची आणि नागरिकांच्या व्यथेची दखल घेत वृत्त ठळकपणे प्रसिद्ध केले.

लोकप्रतिनिधी मैदानात; युद्धपातळीवर काम माध्यमांमधील वृत्तानंतर आणि आंदोलनाची तीव्रता पाहून लोकप्रतिनिधींना (पान २ वर)

---

## मुख्यमंत्री बळीराजा शेत पादण रस्ते योजना समितीवर दत्तू पंडित यांची निवड

**जाफ्राबाद-प्रतिनिधी**

तालुक्यातील देळेगव्हाण येथील माजी जिल्हा परिषद सदस्य दत्तू पंडित यांची मुख्यमंत्री बळीराजा शेत पादण रस्ते योजना भोकरदन जाफ्राबाद विधानसभा क्षेत्रीय समितीवर आमदार निवड समितीचे अध्यक्ष आमदार संतोष दानवे यांच्या वतीने ही निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



मुख्यमंत्री बळीराजा शेत पादण रस्ते योजना ही ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतापर्यंत पोहोचण्यासाठी चांगले रस्ते उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत आहे. अनेक गावांमध्ये शेतरस्त्यांच्या अभावामुळे शेतमाल वाहतूक करताना शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील शेती रस्त्यांचे जाळे मजबूत करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

दत्तू पंडित हे सामाजिक, शैक्षणिक व ग्रामीण विकासाच्या कामात सक्रिय म्हणून ओळखले जातात. गावपातळीवरील विविध प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांची या महत्त्वाच्या समितीवर निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे भोकरदन जाफ्राबाद विधानसभा क्षेत्रातील अनेक प्रलंबित शेतरस्त्यांचे प्रश्न मार्गी लागतील, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत. तसेच ग्रामीण भागातील विकासकामांना गती मिळण्यास मदत होईल, असा विश्वासही ग्रामस्थांनी व्यक्त केला. दत्तू पंडित यांच्या निवडीबद्दल माजी मंत्री रावसाहेब दानवे, आमदार संतोष दानवे, गोविंद पंडित ,माजी जिल्हा परिषद सदस्य शालिक म्हस्के,राजेश चव्हाण,देविदास देशमुख,तालुका अध्यक्ष मनोज शिंदे,मधुकर गाढे,मधुकर देठे, उद्धव दुनगहू, सरपंच बाबासाहेब सवडे,विजय परिहार, ज्ञानेश्वर बनकर,दिनकर पंडित,दादाराव सवडे, शंकर सवडे, रामेश्वर सवडे, बि. डी. सवडे,प्रकाश कापसे,गंगाधर खरात, योगेश बनकर, प्रभू बनकर, अशोक बनकर,मनोज दुनगहू, शालिक शिंदे,बळीराम जगताप, बद्री जगताप गजानन देठे,अशा विविध राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

---

## चंदीगडच्या प्रदूषणावर उच्च न्यायालयाची नजर, महाराष्ट्रासह जालन्याने धडा घेण्याची गरजः ॲड. महेश धन्नावत

**जालना-प्रतिनिधी**

पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने चंदीगडमधील वाढत्या वायू प्रदूषणासंदर्भात दाखल झालेल्या एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना, याचिकाकर्त्याला गेल्या पाच वर्षांतील वायू गुणवत्ता निर्देशांकाची सविस्तर आकडेवारी सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. मुख्य न्यायमूर्ती शील नागू आणि न्यायमूर्ती संजीव बेरी यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. एक सुनियोजित शहर असूनही चंदीगड, पंचकुला आणि मोहाली या ट्रायसिटी परिसरात हवेची गुणवत्ता सातत्याने खालावत असल्याच्या गंभीर मुद्द्यावर या याचिकेद्वारे प्रकाश टाकण्यात आला आहे. विशेषतः हिवाळ्याच्या महिन्यांत येथील वायू गुणवत्ता निर्देशांक अत्यंत खराब आणि गंभीर श्रेणीत पोहोचत असल्याचे याचिकाकर्त्याने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले, जे नागरिकांच्या आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक आहे.

याचिकाकर्त्या सृष्टी शर्मा यांनी स्वतः न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले की, डिसेंबर २०२५ मध्ये चंदीगडमधील वायू गुणवत्ता निर्देशांक ३५३ आणि ४३८ पर्यंत पोहोचला होता, जो सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने एक मोठी आपत्कालीन परिस्थिती दर्शवतो. शहरात औद्योगिक प्रदूषण कमी असूनही बांधकाम, वाहनांचे उत्सर्जन, कचरा जाळणे आणि आजूबाजूच्या प्रदेशातून येणारे प्रदूषण यांसारख्या अनेक कारणांमुळे हवेची गुणवत्ता खालावत आहे. वायू गुणवत्ता निर्देशांकाची माहिती रिअल-टाइममध्ये उपलब्ध असूनही आणि पर्यावरण कायद्यांतर्गत कठोर कारवाईचे अधिकार असूनही, प्रशासकीय यंत्रणा केवळ सूचना जारी करण्यापलीकडे कोणतीही ठोस आणि अंमलबजावणीयोग्य उपाययोजना करत नसल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. याचिकेत पुढे असेही म्हटले आहे की, चंदीगड, पंचकुला आणि मोहाली हे तिन्ही प्रदेश भौगोलिकदृष्ट्या एकाच एअरशेडचा भाग आहेत, परंतु प्रशासकीय विभागणीमुळे प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी एकत्रित आणि प्रभावी उपाययोजना राबवल्या जात नाहीत. धोकादायक हवेच्या सततच्या संपर्कामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून, हे भारतीय संविधानाने दिलेल्या जगण्याच्या अधिकाराचे थेट उल्लंघन आहे. या सर्व बाबींची दखल घेत, उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याला गेल्या पाच वर्षांतील प्रत्येक महिन्यातील चंदीगडमधील सर्वात खराब वायू गुणवत्ता निर्देशांकाची नोंद असलेली आकडेवारी सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी १४ मे २०२६ रोजी होणार आहे. या न्यायालयीन प्रक्रियेवर भाष्य करताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी सांगितले की, ''पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने दिलेले निर्देश हे दर्शवतात की, न्यायव्यवस्था पर्यावरणाच्या संरक्षणाप्रती आणि नागरिकांच्या स्वच्छ हवेच्या अधिकाराप्रती किती गंभीर आहे. सृष्टी शर्मा विरुद्ध केंद्रशासित प्रदेश चंदीगड आणि इतर (-जनहित याचिका-३-२०२६) या प्रकरणातून महाराष्ट्र आणि विशेषतः जालनासारख्या वेगाने विकसित होणाऱ्या शहरांनी एक महत्त्वाचा धडा घेतला पाहिजे. आपल्या शहरांमधील हवेची गुणवत्ता खालावण्यासाठी न्यायालयीन हस्तक्षेपाची वाट न पाहता, स्थानिक प्रशासनाने स्वतःहून पावले उचलणे अत्यंत आवश्यक आहे.'' (पान २ वर)

---

## टेंभुर्णी गावात सुद्धा अठरा दिवसाला नळाला पाणी, नळाला पाणी कमी येताच, महिलांचा मोर्चा ग्रामपंचायत वर

**टेंभुर्णी -प्रतिनिधी**

तालुका जाफराबाद जिल्हा जालना, प्रभात तालुक्यातील सर्वात मोठी वस्ती, सतरा ग्रामपंचायत सदस्यांची ग्रामपंचायत, विविध योजना राबवण्यासाठी मुबलक अशी व्यवस्था, तरीसुद्धा गावामध्ये ग्रामपंचायतच्या नळाला पाणी हे १८ दिवसानंतर येते, नुकतेच नेते मंडळींनी ग्रामपंचायत मध्ये, गावात खडकपूर्णा धरणाची पाणी सुरू झाल्याचा गवगवा केलेला आहे.

एवढा असून सुद्धा गावातील नळाला पाणी हे १८ दिवसानंतर येते. गावामध्ये हे एकूण ४७ झोन असायला हवे. फोनची संख्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनाच माहीत नाही. तसेच सरळ झोन करण्यापेक्षा एका गल्लीतील अर्धा भाग दुसऱ्या दोनदा जोडल्यामुळे, पाण्याची ट्यूबलाईन काही भागांना पाणी येत नाही. २२ मे रोजी नळाला पाणी आले ते ब्राह्मण गल्ली व माळी गल्लीतील पंधरा घरांना. पाणी पंधरा ते वीस मिनिटे हे चालले नाही व नळ बंद झाले. एकतर १८ दिवसानंतर पाणी आले तेही अपूर्ण पाणी आल्यामुळे महिलांचा मोर्चा आणि काही ग्रामस्थांचा मोर्चा ग्रामपंचायत कार्यालयावर गेला. तिथे कोणीही संबंधित जबाबदार व्यक्ती त्यांना भेटला नाही. तसेच तिथे उपस्थित असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी स्वतः त्यांची उडवा-उडूंचे उत्तरे दिल्याचे आमच्या वृत्त प्रतिनिधीशी सांगितले. महिलांनी संध्याकाळी आणि आले नाही तर तीव्र आंदोलन करण्याची इच्छा व्यक्त केल्यानंतर धावपळ सुरू झाली. कामाचे नियोजन हे ग्रामपंचायतला आता जमत नाही असे नागरिकांच्या बोलण्यावरून दिसून येत आहे.

ज्यांच्याकडे असंख्य ग्रामपंचायतचा चार झाले असे अधिकारी असताना त्यांना कोणकोणत्या ग्रामपंचायतकडे लक्ष यावयाची याची योजना ठरवावी लागते. ग्राम विस्तार अधिकारी हा कायमस्वरूपी आणि पर्मनंट असला पाहिजे. मध्य स्थितीमध्ये ग्रामपंचायत सदस्य आणि सरपंच यांचा कार्यकाळ संपलेला असल्यामुळे गावांमध्ये त्यांचे कोणाकडेच लक्ष नाही. तसेच अनेक कार्यकर्ते हे विकासाच्या गप्पा मारताना मात्र पारावर दिसतात. काहींना विकासाच्या संदर्भात बोलल्यास गावातील कार्यकर्ते हे त्यांना राग येतो आणि नाराजी प्रस्थापित केल्या जाते आणि त्या व्यक्तीकडे विशेष लक्ष देऊन ते कार्यकर्ते त्यांच्यावर नजर ठेवतात. मोठ्या ग्रामपंचायतचा प्रश्न असताना सुद्धा विकास कामे फक्त कागदावरच दिसण्याची चित्र आता सध्या गावकऱ्यांना दिसत आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.